जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2017
तरुण भारत

# महिलांबाबत समाजाची मानसिकता बदलण्याची गरज

## राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजात महिलांना दुय्यम समजले जात असल्याने महिलांवरील अन्याय वाढत आहेत. त्यामुळे महिलांप्रती समाजात आदराची भावना निर्माण करणे, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे आणि त्यांच्यावरील अत्याचार करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा बिमोड करणे हे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणून अशा कार्यशाळांच्या माध्यमातून महिलांबाबत समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी केले. 'प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम-२०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने लोककला केंद्रातील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे होते.



**कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे. सोबत डावीकडून रत्नदीप सावंत, कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, प्रा. एन.एस. चव्हाण, लक्ष्मण मानकर आदी.**

डॉ. मोळवणे म्हणाल्या, जोपर्यंत लोकांचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत समाजमनातही बदल होणार नाही. त्यासाठी सामाजिक नैतिक अध:पतन रोखण्यासाठी महिलांच्या संरक्षणाला कायद्याची जोड देण्यात आली आहे, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. आज या ठिकाणी उपस्थित असणारा प्रत्येक व्यक्ती हा आयोगाच्या 'पुश' ('पीपल युनायटेड अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट') या उपक्रमाचा भाग झाला आहे.

त्यामुळे आयोगाच्या 'झिरो टॉलरन्स'च्या धोरणानुसार यापुढे कदापिही महिलांचा लैंगिक छळ खपवून घेतला जाणार नाही. लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा हा असा एकमेव आहे, जो स्त्रियांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे, तसेच यात महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वेळोवेळी बदलही होत आहेत. आयोगानेही या मोहिमेला बळ देण्यासाठी अशा कार्यशाळांचे आयोजन करण्याचे ठरविले आहे.

प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. आयोगाचे मार्गदर्शक विशाल केडिया यांनी दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. ॲड. मेधा ठोंबरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. विद्यापीठाच्या पिठासीन अधिकारी तथा अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्षा प्रा. एन.एस. चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी आयोगाचे लेखाधिकारी रत्नदीप सावंत, प्रकल्पाधिकारी लक्ष्मण मानकर, भिकाजी काटकर, जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे, यांच्यासह २८२ महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्य, अधिकारी यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 FEB 2017
लोकमत

# माणसांमधील नैतिकता जागृत ठेवावी

## मंजूषा मोळवणे : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मांडले विचार

कोल्हापूर : माणसांमधील नैतिकता जागृत ठेवण्याची जबाबदारी आपल्यातील प्रत्येक समाजघटकाची आहे. मात्र, जोपर्यंत लोकांचा महिलांकडे पाहण्याच्या मानसिकतेत बदल होत नाही, तोपर्यंत समाजमनातही बदल होणार नाही. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी मंगळवारी येथे केले.

राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. लोककला केंद्रातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३'ची अंमलबजावणी, कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून झाले. यावेळी आयोगाचे लेखाधिकारी दीप सावंत, प्रकल्पाधिकारी लक्ष्मण मानकर, भिकाजी काटकर, आदी उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एन. एस. चव्हाण यांनी आभार मानले. मार्गदर्शक विशाल केडिया यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या माहिती दिली.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी मार्गदर्शन केले.

### उपसचिव मोळवणे म्हणाल्या

- लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा हा असा एकमेव आहे, जो स्त्रियांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे.
- या कायद्याचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याच्या अभ्यासासाठी विशेष अभ्यासगट नियुक्त केला.
- या अभ्यासगटाच्या अहवालानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे ठरविले आहे. त्याअंतर्गत कार्यशाळा होत आहेत.

### कोल्हापुरातील ६२० प्रकरणांची निर्गत

कार्यशाळेत आयोगाचे जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे यांनी आयोगाचा कोल्हापूर जिल्ह्यातील वाटचालीचा आढावा घेतला. सन २०१५-१६ मध्ये आयोगाकडे दाखल झालेल्या ७१८ प्रकरणांपैकी ६२० प्रकरणांची निर्गत झाली असून, उर्वरित प्रकरणांवर काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

# मानसिकतेमध्ये बदल आवश्यक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. मंजुषा मोळवणे

महिलांप्रती समाजात आदराची भावना निर्माण करणे, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आणि त्यांच्यावरील अत्याचार करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा बिमोड करणे हे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. माणसामधील नैतिकता जागृत ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक समाजघटकाची आहे. मात्र, जोपर्यंत लोकांच्या महिलांकडे पाहण्याच्या मानसिकतेत बदल होत नाही, तोपर्यंत समाजमनातही बदल होणार नाही, असे मत राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजुषा मोळवणे यांनी व्यक्त केले.

राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी लोककला केंद्र सभागृहात 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण अधिनियम - २०१३'च्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी आयोजित कार्यशाळेत बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. मोळवणे म्हणाल्या, 'महिलांचे प्रत्येक टप्प्यावर सामाजिक नैतिक अध:पतन होत आहे. त्याला रोखण्यासाठी महिलांच्या आणि संरक्षणासाठी कायद्याची जोड दिली आहे. हे समजून घेतले पाहिजे. कार्यशाळेत उपस्थित असणारा प्रत्येक व्यक्ती आयोगाच्या 'पीपल युनायटेड अगेंस्ट युनायटेड सेक्शुअल हॅरसमेंट' (पुश) या उपक्रमाचा भाग झाला आहे. त्यामुळे आयोगाच्या 'झिरो टॉलरन्स'च्या धोरणानुसार यापुढे महिलांचा लैंगिक छळ खवून घेतला जाणार नाही. हा एकमेव कायदा स्त्रियांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. तसेच यात महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वेळोवेळी बदलही होत आहेत. कायद्याचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने अभ्यासासाठी विशेष अभ्यासगट नियुक्त केला आहे. त्यामुळे कायद्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्यास मदत होत आहे.'

**लैंगिक छळ, संरक्षण कार्यशाळेत डॉ. मोळवणे यांचे मत**

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे म्हणाले, 'या कायद्याच्या प्रभआवी अंमलबजावमीसाठी विद्यापीठ, महाविद्यालयांतील अंतर्गत तक्रार समित्यांची सकारात्मकता अत्यंत महत्त्वाची आहे. प्राचार्यांनी या कायद्याच्या सर्व बाजूंचा मुळातून अभ्यास करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. राजर्षी शाहू महाराजांनी शंभर वर्षापुर्वी दलित, महिलांच्या हक्कांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा लागू केल्याने त्यांचा पुरोगामी वारसा आजतागायत या परिसराने जपला असल्याचे सांगितले.' मार्गदर्शक विशाल केडिया यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या विविधाविषयी शंकाचे निरसन केले.

कार्यशाळेस आयोगाच्या लेखाधिकारी दीप सावंत, लक्ष्मण मानकर, आनंदा शिंदे, भिकाजी काटकर यांच्यासह प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक व महिला उपस्थित होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्षा प्रा. एन. एस. चव्हाण यांनी आभार मानले.



राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेसाठी उपस्थित प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017
सकाळ

# महिलांचा लैंगिक छळ खपवून घेतला जाणार नाही

## डॉ. मंजूषा मोळवणे : विद्यापीठात लैंगिक छळ प्रतिबंध कायदा जागृती कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या झिरो टॉलरन्सच्या धोरणानुसार यापुढे महिलांचा लैंगिक छळ खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी आज येथे दिला. महिलांवर अत्याचार करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा बिमोड करणे हे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठातर्फे कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी व कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. लोककला केंद्रात कार्यशाळा झाली.

डॉ. मोळवणे म्हणाल्या, "माणसामधील नैतिकता जागृत ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. जोपर्यंत लोकांचा महिलांकडे पाहण्याच्या मानसिकतेत बदल व्हायला हवा. त्यासाठी सामाजिक



डॉ. मंजूषा मोळवणे

नैतिक अधःपतन रोखण्यासाठी महिलांच्या संरक्षणाला कायद्याची जोड देण्यात आली आहे, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. आज या ठिकाणी उपस्थित असणारा प्रत्येक व्यक्ती हा आयोगाच्या पुश पीपल युनायटेड अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट उपक्रमाचा भाग झाला आहे."

त्या म्हणाल्या, "लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा हा असा एकमेव आहे, जो स्त्रियांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. यात महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वेळोवेळी बदलही होत आहेत. या कायद्याचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) त्याच्या अभ्यासासाठी विशेष अभ्यासगट नियुक्त केला. या अभ्यासगटाने आपला अहवाल २०१५ मध्ये सादर केला. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत हा कायदा पोचविण्याची गरज अधोरेखित केली."

डॉ. मोरे म्हणाले, "कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यापीठ, महाविद्यालयांतील अंतर्गत तक्रार समित्यांची सकारात्मकता अत्यंत महत्त्वाची आहे.

प्राचार्यांनी या कायद्याच्या सर्व बाजूंचा मुळातून अभ्यास करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. समिती सदस्यांनीही त्याचा सखोल अभ्यास करून तो समजून घेणे अत्यावश्यक आहे." आयोगाचे जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे यांनी आयोगाचा कोल्हापूर जिल्ह्यातील वाटचालीचा आढावा घेतला. या वेळी आयोगाचे लेखाधिकारी दीप सावंत, प्रकल्पाधिकारी लक्ष्मण मानकर, भिकाजी काटकर, मार्गदर्शक विशाल केडिया उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले.

विद्यापीठाच्या पिठासीन अधिकारी तथा अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष प्रा. एन. एस. चव्हाण यांनी आभार मानले. दिवसभरातील दोन सत्रांत मार्गदर्शक विशाल केडिया यांनी उपस्थितांना लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या विविध पैलूंची सविस्तर माहिती दिली आणि त्यांच्या शंकाचे समाधानही केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 FEB 2017

तरुण भारत


# जलदगती न्यायालयाची स्थापना करा

## राज्य महिला आयोगाच्या उपसचिवांची मागणी; शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मनुष्य जातीला काळीमा फासणाऱ्या कोपर्डी व भिलवडी येथील घटना लक्षात घेता, राज्य महिला आयोगाने गुन्हेगारांना कडक शिक्षा झालीच पाहिजे, अशी भूमिका घेत 'फास्टट्रॅक कोर्ट' (जलदगती न्यायालय) स्थापन करावे, अशी शिफारस राज्य शासनाकडे केल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी मंगळवारी दिली.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटनासाठी त्या आल्या होत्या. यावेळी डॉ. मोळवणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, एखाद्या महिलेवर अन्याय झाल्यानंतर पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवला जातो. या तपासात दिरंगाई होत असेल तर



राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे बोलताना.

'फास्टट्रॅक कोर्ट'अंतर्गत तपास जलद गतीने करण्याची मागणी राज्य महिला आयोग करू शकतो. महाराष्ट्रातील प्रत्येक पोलीस ठाण्याला महिला लैंगिक छळासंदर्भात किती गुन्हे नोंद झाले आहेत, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३' या कायद्यांतर्गत किती जणांना शिक्षा झाली आहे, याची माहिती संकलनाचे काम सुरू आहे. ही आकडेवारी आल्यानंतर अभ्यास करून पुढील भूमिका घेतली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

त्या म्हणाल्या, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३' कायद्याची अंमलबजावणी व जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात हा कायदा २०१३ पासून असूनही दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. या कायद्यांतर्गत तरतुदींविषयी विद्यापीठ परिक्षेत्र महाविद्यालयांतील अंतर्गत तक्रार निवारण समिती सदस्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्राध्यापकांना कायदा, कायद्याचा वापर याबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर जिल्हा समन्वयक, बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती केली जाणार आहे. एखादे महाविद्यालय, विद्यापीठात कामाच्या ठिकाणी महिलेवर अन्याय झाला तर संबंधित व्यक्तीवर काय कारवाई केली, हे सांगणे बंधनकारक आहे. कारण आरटीआयमध्ये कोणतीच गोपनीयता नाही. संबंधित महाविद्यालयातील संस्थापक, प्राचार्य यांच्यापेक्षा जास्त अधिकार समितीतील सदस्यांना असतात. त्या सदस्यांनी मात्र योग्य ती भूमिका घेऊन न्याय दिला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2017
पुण्यनगरी

# महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक

## - डॉ. मंजूषा मोळवणे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
महिलांकडे पाहण्याच्या मानसिकतेत बदल होत नाही, तोपर्यंत समाजमनातही बदल होणार नाही. महिलांप्रती समाजात आदराची भावना निर्माण करणे, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आणि त्यांच्यावरील अत्याचार करू पाहणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींचा बिमोड करणे हे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी विद्यापीठात 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३'च्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. लोककला केंद्र सभागृहात झालेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. मोळवणे म्हणाल्या, सामाजिक, नैतिक अध:पतन रोखण्यासाठी महिलांच्या संरक्षणाला कायद्याची जोड देण्यात आली आहे. या ठिकाणी उपस्थित असणारी प्रत्येक व्यक्ती ही आयोगाच्या 'पुश' या उपक्रमाचा भाग झाली आहे. त्यामुळे आयोगाच्या 'झिरो टॉलरन्स'च्या धोरणानुसार यापुढे कदापिही महिलांचा लैंगिक छळ खपवून



कोल्हापूर : राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यशाळेत बोलताना आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजूषा मोळवणे व इतर मान्यवर.

घेतला जाणार नाही.

लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा हा असा एकमेव आहे, जो स्त्रियांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. या कायद्याचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) त्याच्या अभ्यासासाठी विशेष अभ्यासगट नियुक्त केला. या अभ्यासगटाने आपला अहवाल सन २०१५ मध्ये सादर केला. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत हा कायदा पोहोचविण्याची गरज अधोरेखित केली. त्यानुसार यूजीसीने विद्यापीठांच्या माध्यमातून सर्व संबंधित घटकांपर्यंत विशेषतः विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे ठरवले. त्यामुळे आयोगानेही या मोहिमेला बळ देण्यासाठी या कार्यशाळांचे आयोजन करण्याचे ठरवले.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यापीठ, महाविद्यालयांतील अंतर्गत तक्रार समित्यांची सकारात्मकता अत्यंत महत्त्वाची आहे. प्राचार्यांनी या कायद्याच्या सर्व बाजूंचा मुळातून अभ्यास करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. समिती सदस्यांनीही त्याचा सखोल अभ्यास करून तो समजून घेणे अत्यावश्यक आहे.

आयोगाचे जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे यांनी आयोगाचा कोल्हापूर जिल्ह्यातील वाटचालीचा आढावा घेतला. २०१५-१६ मध्ये आयोगाकडे दाखल झालेल्या ७१८ प्रकरणांपैकी ६२० प्रकरणांची निर्गत झाली असून उर्वरित प्रकरणांवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवसभरामध्ये झालेल्या दोन सत्रांत मार्गदर्शक विशाल केडिया यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या विविध पैलूंची सविस्तर माहिती दिली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या पीठासीन अधिकारी तथा अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष प्रा. एन. एस. चव्हाण यांनी आभार मानले. आयोगाचे लेखाधिकारी दीप सावंत, प्रकल्पाधिकारी लक्ष्मण मानकर, भिकाजी काटकर, मार्गदर्शक विशाल केडिया यांच्यासह संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठाचा परीक्षा हंगाम २४ मार्चपासून

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेस २४ मार्चपासून प्रारंभ होत आहे. त्याबाबतची माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली आहे.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.सी.एस., लॉ, बी.बी.ए., बी.ए.बी.एडसह अन्य अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या तारखा व अभ्यासक्रमनिहाय शुल्क जाहीर केले आहे. दूरशिक्षण माध्यमाची अभ्यास केंद्रे ज्या महाविद्यालयांकडे आहेत, त्यांनी नियमित विद्यार्थ्यांसह दूरशिक्षण माध्यमाच्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करायची आहे.

पान २ वर »

## महाविद्यालयांसाठी आवाहन

- महाविद्यालयांकडे जसजसे परीक्षा अर्ज जमा होतील, त्या दिवशीच परीक्षा अर्ज ऑनलाइन करण्यात यावेत. अंतिम तारखेची प्रतीक्षा करण्यात येऊ नये. अन्यथा सर्व्हरवर अतिरिक्त ताण येऊन कामकाज ठप्प होते, असे आवाहन श्री. काकडे यांनी केले आहे.
- काही विद्यार्थ्यांचे निकाल तांत्रिक कारणास्तव अथवा परीक्षा प्रमाद प्रकरणामुळे विलंबाने जाहीर होतात. अशा विद्यार्थ्यांसाठी निकाल जाहीर झाल्यापासून सात दिवसांत परीक्षा अर्ज भरून महाविद्यालयाकडे सादर करावा. अर्जाचे प्रवेश शुल्क विनाविलंब स्वीकारावे व अर्ज पाठवावा.

## सेट परीक्षा १६ एप्रिलला

राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) १६ एप्रिल, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी एमएचटी-सीईटी (सामाईक प्रवेश परीक्षा) परीक्षा ११ मे रोजी होत आहे. या परीक्षेवेळी विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षा होणार नाहीत.

## अर्ज भरण्याच्या तारखा अशा

- विनाविलंब - २८ फेब्रुवारीपर्यंत
- विलंब शुल्कासह (५० रुपये) - १ ते ६ मार्च
- अतिविलंब शुल्कासह (५० ते ३०० रुपये) - ७ ते ११ मार्च

## विद्यापीठाचा परीक्षा हंगाम २४ मार्चपासून

» पान १ वरून

**अशा होतील परीक्षा...**

- बी. ए. व बी. कॉम. भाग १ (सत्र एक) : २४ मार्चपासून
- बी. ए. भाग २ (सत्र तीन) : ४ मे
- बी. ए. भाग ३ (सत्र पाच) : १ एप्रिल
- बी. कॉम. भाग २ (सत्र तीन) : १९ एप्रिल
- बी. कॉम. भाग ३ (सत्र पाच) : १ एप्रिल
- बी. एस्सी. भाग १ (सत्र एक) : १० एप्रिल
- बी. एस्सी. भाग २ (सत्र तीन) : २३ मे
- बी. एस्सी. भाग ३ (सत्र पाच) : २३ मे
- एम. ए. भाग १ (फिलॉसॉफी-सीबीसीएस) : २८ एप्रिल
- एम. ए. भाग १ (इतिहास-सीबीसीएस) : ९ मे
- एम. ए. भाग २ (इतिहास-सीबीसीएस) : ९ मे
- एम. ए. भाग १ (अर्थशास्त्र-सीबीसीएस) : २१ एप्रिल

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर सर्व विभागाच्या परीक्षा २४ मार्चपासून सुरू होणार आहेत. या परीक्षा १६ मे २०१७ अखेरपर्यंत सुरू असून, विद्यापीठ अंतर्गत सर्व परीक्षांचे वेळापत्रक शिवाजी विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती पत्रकाव्दारे विद्यापीठ परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली आहे.

सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज विहीत नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने भरावेत, हस्तलिखित अर्ज महाविद्यालयांनी स्वीकारू नयेत. परीक्षा अर्ज भरण्यासाठी अडचणी आल्यास विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. परीक्षा अर्ज भरण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांची प्रवेशानंतर पात्रता पूर्ण झालेली नाही अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन उपलब्ध होणार नाहीत. संबंधितांनी पात्रता विभागाशी संपर्क साधवा. परीक्षा अर्ज घेऊन विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठाकडे पाठवू नये. महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत शाखानिहाय संबंधित विभागाकडे अर्ज सादर करावेत. महाविद्यालयांनी गेल्या दोन-तीन वर्षांचे ई-सुविधा शुल्क भरणा केलेला नाही. तरी अशा महाविद्यालयांनी येथून पुढे दंड आकारणी तरतूद करण्याचे विचाराधीन आहे. आपल्या महाविद्यालयांकडून येणे असलेल्या ई-सुविधा रकमेचा भरणा तत्काळ



- विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या सूचना

विद्यापीठाकडे करण्यात यावा. परीक्षांचे मानधन व अनुषंगिक भत्ते विद्यापीठ नियमानुसार त्या त्या महाविद्यालयांनी अदा करावेत. फेरतपासणी किंवा गुणपडताळणी पूर्ण व्हायची असली तरीही विद्यार्थ्यांचा अनुत्तीर्ण विषयाचा परीक्षा अर्ज भरणे आवश्यक आहे.

### १५ व १६ एप्रिल रोजी परीक्षा नाहीत

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) १६ एप्रिल रोजी आहे. त्यामुळे १५ व १६ एप्रिल रोजी कोणतीही परीक्षा होणार नाही. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची 'एमएचटी-सीईटी' सामाईक प्रवेश परीक्षा ११ मे रोजी आहे. त्यामुळे १० व ११ मे रोजी कोणतीही परीक्षा होणार नाहीत.

### ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्यासाठी बँक व खातेक्रमांक

| बँकेचे नाव | आयएफएससी कोड | खाते क्रमांक |
|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया, लक्ष्मीपुरी | BKID0000900 | A/C NO-090020100002531 |
| युको बँक, विद्यानगर | UCBA0000289 | A/C NO-02890200000001 |
| बँक ऑफ महाराष्ट्र,ताराबाई पार्क | MAHB0000413 | A/C NO-20027601139 |
| स्टेट बँक ऑफ इंडिया,दसरा चौक | SBIN0000413 | A/C NO- 30309146380 |
| आय. डी. बी. आय,शिवाजी चौक | IBKL0000463 | A/C NO-9301001001667 |
| अॅक्सिस बँक राजारामपुरी | UTIB0000134 | A/C NO- 915020055386875 |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017
सकाळ

# स्पर्धा परीक्षेला उत्तम तयारीने उत्तर द्या

## मदन नागरगोजे : विद्यापीठात 'स्पर्धा परीक्षा कौशल्ये' विषयावर व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : स्पर्धा परीक्षा युद्धापेक्षा कमी नसतात, त्या युद्धासारख्याच असतात. त्यांना आपल्या उत्तम तयारीच्या गनिमी काव्याने उत्तर दिले पाहिजे, असे प्रतिपादन झाशी (यू.पी.) येथील जिल्हाधिकारी मदन नागरगोजे यांनी केले.



मदन नागरगोजे

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या शाहू सभागृहामध्ये आयोजित 'स्पर्धा परीक्षा कौशल्ये' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले होते. श्री. नागरगोजे म्हणाले, ''विद्यार्थ्यांचे मन मोबाइलसारखे असते. त्यामध्ये अभ्यासाच्या गोष्टी इन्स्टॉल केल्यास ध्येयप्राप्ती होणे शक्य आहे. स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना प्रथम आपण जीवनामध्ये काय होऊ इच्छितो आणि काय होऊ इच्छित नाही, याचा निश्चित वेध घेणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा एक यज्ञ आहे. त्यामध्ये स्वतःला समर्पित करण्याची तयारी असली पाहिजे.''

ते म्हणाले, ''ध्येयवेडे लोक सायकॉलॉजीचा अभ्यास करतात. त्याचा आपल्या जीवनामध्ये खूप उपयोग होतो. विद्या ही जीवन पद्धती असून उपलब्ध व्यासपीठाचा योग्य उपयोग केला पाहिजे. खेळ फक्त स्पर्धेसाठी नसून त्याचा उपयोग अभ्यासासाठीही करून घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना जीवनामध्ये मार्गदर्शक ठरणारे, सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे संस्कारिक चित्रपटही पाहिले पाहिजेत. जीवनाचा लढा एकट्याच्या ताकदीवर पूर्ण करता येत नाही. त्यासाठी चांगल्या शिक्षकांच्या सहकार्याची, मार्गदर्शनाची गरज भासते.'' स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी उपलब्ध वेळेचे योग नियोजन करणे आवश्यक आहे. संवादकौशल्याबरोबरच आवश्यक असे इंग्रजीचे ज्ञानही असणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. चौगुले म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी स्वतःशी स्पर्धा करावी आणि स्पर्धा करीत असताना खिळाडू वृत्ती जोपासावी. आपल्याकडील उपलब्ध साधनांचा वापर करून स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त करणे शक्य आहे.'' कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# राष्ट्रीय युवा महोत्सव शुक्रवारपासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



ऑल इंडियन युनिर्व्हसिटीजच्यावतीने शिवाजी विद्यापीठ येथे राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाचे शुक्रवारी (ता. १०) दुपारी साडेपाच वाजता श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते होणार आहे. देशभरातील विविद विद्यापीठांतील युवाकलाकार या महोत्सवात कलागुणांची उधळण करणार आहेत. उद्घाटनासाठी एआययूचे डॉ. सॅम्प डेव्हीड प्रमुख उपस्थित असतील, केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालयाच्या सहकार्याने आठ वर्षानंतर 'शिवोत्सवा'च्या माध्यमातून विद्यापीठात महोत्सव होत आहे.

विविध कलाप्रकारांद्वारे भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे. महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कला-गुणांना राष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ उपलब्ध करुण देण्याच्या उद्देशाने एआययू आणि केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सव घेण्यात येत आहे. मागील वर्षी म्हैसूरमध्ये महोत्सव झाला होता. यावर्षीचा ३२ वा महोत्सव शिवाजी विद्यापीठात होणार आहे. त्यामध्ये संगीत, गायन, फाइन, नृत्य, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, लघुनाटिका, मूकनाट्य, एकांकिका अशा विविध २५ कलाप्रकारांमध्ये स्पर्धा होतील. देशातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्यवर्ती विभागातील विद्यापीठे सहभागी होणार आहेत. महोत्सवातील विविध कलाप्रकारांमधील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेते संघ 'शिवोत्सव'मध्ये सहभागी होतील.

महोत्सवातील देशभरातील ८२ विद्यापीठांतील सुमारे दीड हजार युवक-युवती कलाकार सहभागी होणार आहेत. महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन कोल्हापूरकरांना घडणार आहे. महोत्सवातील विजेत्यांची निवड दक्षिण आशियाई आंतरविद्यापीठ युवा महोत्सवासाठी होणार आहे. महोत्सवाचा समारोप मंगळवारी (ता. १४) होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे उपस्थित राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 FEB 2017

पुण्यनगरी

# शिवोत्सवास शुक्रवारी प्रारंभ

## महोत्सवावर उमटणार कोल्हापुरी छाप

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय युवा महोत्सवास शुक्रवार, दि. १० पासून सुरुवात होणार आहे. पाच दिवस चालणाऱ्या या राष्ट्रीय पातळीवरील महोत्सवाचे यजमानपद आठ वर्षांनंतर विद्यापीठास मिळाले आहे. त्यामुळे आयोजनात कोणतीही उणीव राहू नये, यासाठी विद्यापीठातर्फे शिवमहोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. या महोत्सवात कोल्हापूरची छाप उमटवण्यासाठीही विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत.



भारतीय संस्कृतीचे दर्शन युवावर्गाला घडावे यासाठी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आणि केंद्र सरकारच्या क्रीडा आणि युवा मंत्रालयाच्या सहकार्याने प्रतिवर्षी युवामहोत्सव घेण्यात येतो. देशभरातील संस्कृतीबरोबर कोल्हापूरच्या समृद्ध परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, असे प्रयत्न विद्यापीठातर्फे सुरू आहेत. त्यानुसार चित्ररथ, गायन, मर्दानी खेळ, लोककलांच्या माध्यमातून कोल्हापूरचे दर्शन घडणार आहे. त्याचबरोबर कोल्हापुरी खाद्यपदार्थांची चवही बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना चाखायला मिळणार आहे.

शिवोत्सवाच्या आयोजनासाठी विविध प्रकारच्या २६ समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांवर सहभागी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी जबाबदारी देण्यात आली आहे. बाहेरील विद्यापीठांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या ▶▶ पान २ वर

# शिवोत्सवास शुक्रवारी प्रारंभ

**(पान १ वरून)** वसतिगृहात सोय करण्यात येणार आहे. देशभरातून विद्यार्थी येणार असल्याने काही विद्यापीठांचे संघ बुधवार, ८ तारखेच्या रात्रीपासूनच येण्यास सुरुवात होणार आहे. सर्व संघ शुक्रवारपर्यंत दाखल होणार आहेत. बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रवेशद्वारावरच चौकशी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. या कक्षामध्ये विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण केले जाणार आहे. देशभरातील विविध कला प्रकार सादर होणार असल्याने साधारण दहा हजार लोक महोत्सवाला उपस्थित राहतील या अंदाजाने विद्यापीठ परिसरात ठिकठिकाणी पार्किंगची सोय केली जात आहे.

गेल्या वर्षीचा युवामहोत्सव म्हैसूरमध्ये झाला होता. यंदाचा ३२ वा महोत्सव शिवाजी विद्यापीठात होत आहे. विद्यापीठाने महोत्सवाची परिपूर्ण तयारी चालवली आहे. गेल्या महिनाभरापासून महोत्सवाची ऑनलाईन नोंदणी चालू आहे. सहभागी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी अंतिम क्षणापर्यंत नोंदणी विद्यापीठातर्फे सुरू राहणार आहे. या महोत्सवाची पूर्ण माहिती देणाऱ्या मोबाईल ॲपचीही निर्मिती करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 FEB 2017

पुण्यनगरी

# शोभायात्रेतून घडणार संस्कृतीचे दर्शन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवमहोत्सवाची सुरुवात शोभायात्रेच्या माध्यमातून होणार आहे. या शोभायात्रेमध्ये कोल्हापूरच्या विविध संस्कृतीचे दर्शन उपस्थितांना होणार आहे, तर नोटाबंदी हा विषय घेऊन अनेक महाविद्यालयांचे चित्ररथ यात्रेत सहभागी होणार आहेत.

राष्ट्रीय युवामहोत्सवामध्ये देशभरातील नावाजलेली १०० पेक्षा जास्त विद्यापीठे सहभागी होणार आहेत, तर पाच दिवसांच्या या महोत्सवांतर्गत विद्यार्थांचे सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा, चर्चासत्रे असे उपक्रम व कार्यक्रम राबवले जाणार आहेत. या महोत्सवामध्ये दीड हजारहून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी दुपारी शोभायात्रेने करण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदींनी नुकत्याच घेतलेल्या नोटाबंदी या विषयाच्या आधारे शोभायात्रेमध्ये विद्यापीठांचे चित्ररथ सहभागी होणार आहेत, तर वेगवेगळ्या राज्यातून आलेले विद्यापीठांचे विद्यार्थी चित्ररथातून आपल्या प्रांताची, संस्कृतीची ओळख उपस्थितांना करून देणार आहेत. त्याप्रमाणे यजमान असलेल्या शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थीही नोटाबंदी ही थिम डिजिटल माध्यमातून सादर करणार आहेत, तर कोल्हापूरची संस्कृती व परंपरेचे दर्शन आपल्या चित्ररथांतून घडणार आहे. या चित्ररथांमध्ये शाहू महाविद्यालयाचे झांजपथक, मर्दानी खेळ, कोल्हापूरची उद्योग परंपरा, खेळपरंपरा, कलापरंपरेचे दर्शन आलेल्या प्रत्येकाला होणार आहे. ही शोभायात्रा विद्यापीठ परिसरातच मर्यादित न राहता शहरातील प्रमुख भागांमधून जाणार आहे. त्यामध्ये सायबर चौक, बाईचा पुतळा, मालती अपार्टमेंट, एन.सी.सी. भवन अशा मार्गातून जाऊन पुन्हा विद्यापीठामध्ये दाखल होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017
सकाळ

# संधी मिळत नसल्याने स्त्री आजही मागास

## डॉ. नागला : 'लैंगिकतेचा प्रश्न, समस्या आणि आव्हाने'वर चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : पुरुषांबरोबर संधी मिळत नसल्याने स्त्री वर्ग आजही मागास असल्याचे मत हरियाणा येथील महर्षी दयानंद विद्यापीठातील समाजशास्त्राच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मधू नागला यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे यू.जी.सी. सॅप - डी. आर. एस. फेज अंतर्गत आयोजित 'भारतातील लैंगिकतेचा प्रश्न : समस्या आणि आव्हाने' विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात त्या बोलत होत्या. समाजशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. आर. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रा. नागला म्हणाल्या, "महिलांच्या आरोग्याकडे त्या त्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. त्यामुळे अनेक शारीरिक व्याधींना त्यांना तोंड द्यावे लागते. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात देखील स्त्रियांना पुरुषांबरोबर स्थान मिळाल्याशिवाय स्त्रियांचा सन्मान केला असे होणार नाही. तसेच घरगुती हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे."

डॉ. पाटील यांनी स्त्री प्रश्नांसंबंधी तरुण संशोधकांनी जागृत राहून संशोधन केले पाहिजे, असे सांगितले.

दोन दिवस चाललेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात या विषयांतर्गत देशभरातून आलेल्या प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, विचारवंतांनी ७० हून अधिक संशोधन पेपर सादर केले.

या वेळी प्रा. बी. के. नागला, डॉ. विजय मारुलकर, डॉ. एस. सी. राजोरा, डॉ. शैलजा मान, डॉ. अर्चना जगतकर उपस्थित होते.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निशा देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 FEB 2017

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत शिबिर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील विधी अधिविभागामार्फत एकदिवसीय मोफत कायदेविषयक शिबिर पुष्पनगर (ता. भुदरगड) येथे आयोजित करण्यात आले होते.

डॉ एम. डी. भानारकर यांनी 'डिजिटल लॉकर व कॅशलेस ट्रान्झेशन' या विषयावर गावकऱ्यांना माहिती दिली. विधी अधिविभागाचे विद्यार्थी संतोष शेलार यांनी माहितीचा अधिकार आणि त्यांचा वापर याबद्दल माहिती दिली.



त्याचबरोबर विधी अधिविभागाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पर्यायी तंटामुक्ती निवारण आणि त्याचे फायदे यावर लघुनाटिका सादर केली. द्वितीय सत्रामध्ये विधी अधिविभागाच्या सहायक प्रा. कविता यादव यांनी 'हुंडाबळी एक ज्वलंत समस्या ' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, या सत्रामध्ये विधी अधिविभागाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी 'फसारामची कमाल आणि अंनिसची धमाल' या विषयावर नाटिका सादर केली. या नाटिकेमार्फत विद्यार्थ्यांनी जादूटोणा विरोधी कायद्याची माहिती गावकऱ्यांना दिली. या कार्यक्रमाला गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे कोल्हापूर विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेशचंद्र मोरे तसेच कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवाजीराव राणे, डॉ. एम. डी. भानारकर, डिपार्टमेंट ऑफ इलेक्टॉनिक्सचे एम. डी. देसाई आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक विधी विभागाचे प्रभारी विभागप्रमुख वी. वाय. धूपदाळे यांनी केले. सूत्रसंचालन विधी अधिविभागाच्या विद्यार्थिनी पूजा कांबुज हिने केले. एम. डी. देसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2017
तरुण भारत

# विधी विभागातर्फे पुष्पनगरमध्ये कायदेविषयक शिबिर उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विधि अधिविभागामार्फत एक दिवसीय मोफत कायदे विषयक शिबीर भुदरगड येथील पुष्पनगरमध्ये उत्साहात पार पडले. प्रमुख पाहुणे कोल्हापूर विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेशचंद्र मोरे होते. अध्यक्षस्थानी डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिकचे डॉ. एम. डी. भानारकर होते. कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवाजीराव राणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी बोलताना डॉ भानारकर यांनी 'डिजिटल लॉकर व कॅशलेस ट्रांझिक्शन' या विषयावर तर विधि अधिविभागाचे विद्यार्थी संतोष शेलार यांनी 'माहितीचा अधिकार आणि त्याचा वापर' याविषयावर माहिती दिली. विधि अधिविभागाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पर्यायी तंटा मुक्ती निवारण आणि त्याचे फायदे व 'फसारामची कमाल आणि अंनिसची धमाल' लघुनाटकातून जादूटोना विरोधी कायद्याची माहिती दिली. प्रास्ताविक विधि विभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. वि. व्हाय. धुपदाळे यांनी केले. सुत्रसंचालन पुजा कांबुज यांनी केले. आभार सामाजिक कार्यकर्ते एम. डी. देसाई यांनी मानले.

**▪ विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना दिली कायद्याची माहिती**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 FEB 2017

सकाळ

# क्रिकेट स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभाग विजेता

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या अग्रणी महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ अजिंक्य ठरला. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या मैदानावर स्पर्धा झाली. स्पर्धेमध्ये नऊ महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदवला. अंतिम लढत तंत्रज्ञान अधिविभाग विरुद्ध धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स कागल (BIMAT) यांच्यात झाली. 'बीमॅट' संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ११४ धावा केल्या. बीमॅट संघातील ऋषीकेश सावरे व मदन पाटील यांनी चमकदार खेळी केली. प्रत्युत्तरादाखल तंत्रज्ञान अधिविभाग संघातील प्रथमेश यादव याने ५२, तर वैभव क्षीरसागरने २९ धावा करत सामना जिंकला. स्पर्धेसाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, क्रीडा समन्वयक एस. एम. लोखंडे यांनी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 FEB 2017
पुढारी

# तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ अजिंक्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ अजिंक्य ठरला.

स्पर्धेची अंतिम लढत यजमान विद्यापीठाचे तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ व धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, कागल (बी.मॅट) या संघात पार पडली. सामन्याची नाणे फेक बी.मॅट संघाने जिंकून प्रथम फलंदाजी करत ११४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल तंत्रज्ञान अधिविभाग संघाने लक्षवेधी लढत देत ४ गडी राखून विजय प्राप्त केला. स्पर्धेच्या अयोजनासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले तसेच क्रीडा समन्वयक एस. एम. लोखंडे, विद्यापीठ क्रीडा विभाग व अभियांत्रिकी विभागाचे सहकार्य लाभले.